VOL- XI ISSUE- II FEBRUARY 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# दलित साहित्य - आजचे क्रांती विज्ञान बाबुराव बागुलांच्या मुक्त अभिव्यक्तीचा विद्रोही अविष्कार

**प्रा. डॉ. केशव आलगुले**
मराठी विभाग
जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर.

बाबुराव बागूल हे मराठी दलित साहित्यातील क्रांतिकारक लेखक म्हणून ओळखले जातात, दलित साहित्यातील कथा, कादंबरी व इतर अनेक प्रकारात त्यांनी साहित्य लेखन केले आहे. त्यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील विहितगाव येथे एका गरीब दलित कुटुंबात झाला असून शिक्षण विहितगाव आणि मुंबई येथे अकरावी पर्यंत झाले, काही दिवस सुरुवातीला लॉन्ड्री मधील मार्कर, दवाखान्यातील कंपाउंडरचा सहाय्यक, अशा नोकऱ्या केल्या, दादरच्या कोहिनूर मिलमध्ये आणि नंतर माटुंगा येथे रेल्वेच्या यंत्र शाळेत कामगार म्हणून त्यांनी बारा वर्षे काम केले. १९६८ साली रेल्वेच्या नोकरीचा त्यांनी राजीनामा दिला आणि आपल्या मनातील खदखदती संवेदनशीलता लेखणीच्या माध्यमातून बाहेर काढण्यासाठी पूर्णवेळ सज्ज झाले.बाबूराव बागूल यांच्या अंतर्मनात मार्क्स, लेनिन, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मॅक्झिम गॉर्की, चेकॉव्ह आणि शरच्चंद्र चतर्जी यांच्या विचाराने आणि साहित्याने प्रभावित झालेली संवेदना स्वस्त बसू देत नव्हती. भारतीय समाजव्यवस्थेत प्रचलित असलेले विषमतेचे चटके त्यांना सहन होत नव्हते. शोषित समाजाच्या शोषिकपणाचा विद्रोह बाबूराव बागूल यांच्या लेखणीच्या रूपाने बाहेर पडला. 'जेव्हा मी जात चोरली होती' (१९६८) 'मरण स्वस्त होत आहे (१९६९) आणि 'सूड' (१९७०) लघु कादंबरी किंवा दीर्घकथा या बागुलांच्या साहित्यकृती गाजल्या. सामाजिक विषमतेचा बळी होऊन झोपडपट्टीत नाहीतर गावकुसाबाहेर राहणाऱ्या दुःख दैन्याने ग्रासलेले आणि अन्याय अत्याचाराविरुद्ध पण करून उठणारा शोषित दलित अपमानित माणूस बागुल यांच्या कथाचा केंद्रबिंदू ठरला. या दलित माणसाच्या इच्छा आकांक्षांचा सुख दुःखांचा जाणीव आणि वासना विकार यांचा शोध घेत असताना त्यांची दाहकता आणि समाज वास्तवाचे दर्शन बागुल यांनी या साहित्यकृतीच्या माध्यमातून कळविणे त्यांच्या 'सूड' या दीर्घ कथेच्या माध्यमातून पुरुषी अत्याचाराविरुद्ध बंड करून उठलेल्या जानकी नावाच्या तरुणीची कथा आहे, अनेक वर्षांपासून मनात साचत गेलेल्या दुःखांना वाचा फोडण्याची तसेच वास्तवाच्या पलिकडील व्यापक अर्थपूर्णता सुचित करण्याची इच्छा बाबुराव बागूल यांनी आपल्या लेखणीतून पूर्ण केली होती. अशा साहित्यकृतीचा विचार करत असताना साहित्याची क्रांतिकारकता नेमकी कोणत्या सांस्कृतिक वैचारिक व वांड्मयीन विचारात आहे, हे त्यांनी आपल्या भाषणातून व लेखातून ही स्पष्ट केले आहे. त्यांच्या वांङ्मयीन वैचारिक भूमिकेचा रसिकतापूर्ण आविष्कार त्यांनी लिहिलेल्या काही प्रस्तावनातून पाहायला मिळतो. त्यांच्या प्रस्तावना, भाषण, लेखन यांचा अंतर्भाव 'दलित साहित्य : आजचे क्रांतीविज्ञान' या १९८१ सली प्रसिद्ध झालेल्या ग्रंथातून लक्षात येतो. अस्पृश्यतेचे जळजळीत अनुभव व्यक्त करणाऱ्या काही कविताही बागुल आणि लिहिल्या आहेत. ज्ञान, विज्ञान आणि लोकशाही समाजवाद यांचे बागुल हे निष्ठावंत पुरस्कृते असून त्यांच्या या निष्ठेचा प्रत्यय त्यांच्या अनेक निबंधातून, भाषणातून येतो. 'आम्ही' नावाचे मासिक हे त्यांनी सुरू केले. 'निकाय' सारख्या काही दलित नियतकालिकांचा सल्लागार लेखक म्हणून त्यांचा संबंध आला. महाराष्ट्र बुद्ध साहित्य सभेचे महाड येथे आयोजित केलेल्या दलित साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते, अशा या बाबूराव बागूल यांच्या 'दलित साहित्य: आजचे क्रांतीविज्ञान' या ग्रंथाच्या परिक्षणाच्या निमित्ताने ग्रंथातील महत्त्वपूर्ण बाबीची नोंद आज घेणार आहोत, बाबूराव बागूल यांचे 'दलित साहित्य: आजचे क्रांतविज्ञान' या पुस्तकामध्ये पूर्णता समीक्षा लेखनही नाही आणि पूर्णता कथा-कविता लेखनही नाहीत तर यामध्ये दलित साहित्य विषयक विचार संकलित करण्यात आले

आहेत. बाबुराव बागूल यांच्या नियतकालिकातील, वर्तमानपत्र किंवा इतर ग्रंथातून १९८० पूर्वी प्रसिद्ध झालेले लेख, स्वगत व इतर पुस्तकांसाठी लिहिलेल्या प्रस्तावना, मुलाखती आणि काही भाषणांचा समावेश आहे. या ग्रंथामध्ये लेख आलेली आहेत ते पृ.०३ते ९९ पर्यंत बाबुराव बागूल यांच्या सात लेखांचा समावेश आहे. 'काळोख्याच्या कैद्यांची क्रांतीमान कैफियता', 'दलित साहित्य हे तर माणसांचे साहित्य!', 'भारतात फॅसिझमची बिजे आहेत', 'मराठवाडा जातीय दंगल: एक शोध', 'हिंदू साहित्य व जातिवाद', 'ढासळते किल्ले: जाती' दलित चळवळ पुन्हा विघटनाकडे?, तर (पृ. क्र ११३ ते १५१) यादरम्यान समीक्षा व प्रस्तावना आलेल्या आहेत. या ग्रंथातील बाबुराव बागुल यांच्या लेखनाचा दुसरा भाग बाबूराव बागूल यांनी केलेली समीक्षा व अनेक ग्रंथांना प्रस्तावना, 'दलित साहित्याची दिशा ऑडिट', 'उत्थानगुंफा जडवादी क्रांतीचे रुद्रसुंदर काव्यललेणे', 'आठवणीचे पक्षी : धुमसणारे पंख' तर तिसऱ्या टप्प्यामध्ये पृ. १६५ ते १७७ दरम्यान बाबुराव बागूल यांच्या दोन मुलाखती आहेत या मुलाखतीमध्ये 'दलित साहित्याचा आजचा समर्थ लेखक: बाबुराव बागूल', 'बाबुराव बागुल दलित जीवनाचा क्रांतदर्शी भाष्यकार' या दोन मुलाखतींचा समावेश करण्यात आला असून पुढे 'स्वगत' (पृ.२२७ ते २५३ पर्यंत) बाबुराव बागूल यांच्या अंतर्मनातील दलित साहित्या विषयीचे आणि हिंदू धर्मातील जातीयता, अस्पृश्यता याविषयीचे विचार व्यक्त झाले आहेत. या ग्रंथातील शेवटचा भाग म्हणजे (पु.२५७ ते २७) बाबुराव बागुल यांची 'भाषणे', 'दलित साहित्य म्हणजे सूडवाद्यांचे साहित्य नाही', 'दलित म्हणजे हे जग आणि जीवन नव्याने भांडणारा' आणि 'दलित हाच युगनायक' या ग्रंथामध्ये बाबुराव बागुल लिखित सर्व प्रकारच्या साहित्याची नोंद घेण्यात आली आहे. दलित साहित्य चळवळीमध्ये बाबूराव बागुल यांचे योगदान अतिशय मोलाचे आणि महत्त्वाचे आहे. हे त्यांच्या लेखातून दलित साहित्य विषयीचे चिंतन वारंवार प्रत्ययास येते. मात्र या पुस्तकातील सर्व लेख किंवा लेखन हे संकलीत असल्याने यात अनेक ठिकाणी विचारांची पुनरावृत्ती झालेली आहे. या ग्रंथातील पहिलाच 'लेख काळोखाच्या कैद्यांची क्रांती मान कैफियत !', या लेखामध्ये माणसाच्या सर्व शक्ती स्वतंत्र व्हाव्यात म्हणजे वादळे होतील, वनवे पडतील. रथ येतील, सुखे वर्षतील- विश्वाच्या महाकाव्याचा नायक असलेल्या माणसाला एकच प्रार्थना-

*"हे प्रज्ञावंत प्रलयंकारी माणसा,*
*साऱ्या विश्वाचे नामकरण तू केलेस आणि सर्वांना गळा भरून हाक मारलीस*
*हे सुर्या हे चंद्रा हे शून्य*
*हे संखे हे मुंगी आणि हे पर्वता*
*आणि तुझ्या हाती प्रमाणे ते झाले...*
*आताही तसेच होईल तू हाक मार हे तुझे होऊन येतील".*
*(पृ.12)*

मराठी साहित्यामध्ये विविध वाड्.मय प्रकार निर्माण होत असताना दलित साहित्य या वेगळ्या प्रकारची प्रवाहाची गरज काय? या लेखातून स्पष्ट करताना म्हणतात, "दलित साहित्याचा उदय हे मराठी साहित्याच्या वैचारिक किंवा ललित शाखेत होत नाही तर तिथल्या अस्पृश्यतेत होतो. भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा इथल्या समाज व्यवस्थेवर गांधीवाद प्रभावित होता, सर्वोदय वाद होता, समाजवाद होता, कम्युनिजम होते, मात्र काही काळातच सामान्य माणूस हे सर्व विसरून धर्मवाद आणि जातिवाद याच्यामध्ये गुंतत गेला. धर्माच्या आणि जातीच्या अस्तित्वासाठी आणि अस्मितेसाठी लढण्यास आपल्या अस्तित्वाचा प्रश्न मानू लागला. हिंदू असेल तर हिंद होऊन, मुस्लिम असेल तर मुस्लिम होऊन, जातीय दंगलीत सामील होऊ लागला आणि हे असंच घडत राहिल्यामुळे जातीयवादी पक्ष खूप वेगाने बलवान होत गेले, डावे पक्ष कमकुवत होत गेले. एकंदर भारतीय समाज अजूनही आधुनिक होत नाही, तो बाबासाहेबांनी घडवलेल्या दलित समाजाने मात्र त्यांच्या भीषण देव-देवता, त्यांचे पूजा प्रकार जुनी पारंपरिक जीवन नाकारून त्यांचे मन नकार - विद्रोह आणि माणुसकीने ठासून भरलेले आहे, हे विचार समाजाला देऊन परिवर्तन घडवून आणले. अस्पृश्यतेविरुद्ध आपल्या या लढ्यात आणि त्यातून बनलेल्या विद्रोही मनामनातून दलित साहित्य जन्माला आले.

दलित साहित्याच्या उगमाचा परामर्श घेताना बाबुराव बागुल काही संदर्भ देतात. बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर त्यांच्या भाषणाने आणि निबंधाने प्रभावित झालेले कवी आणि त्या कवींनी निर्माण केलेले जलसे यांचे योगदान सांगून त्यातील प्रचारकी थाटामुळे आलेला एकसुरीपणा ही ते स्पष्ट करतात. त्यानंतर वर्ग कलहाचे तत्त्वज्ञान मांडणारे अण्णा भाऊ साठे, अस्पृश्यतेचे विषयी करूणा निर्माण करणारे शंकरराव खरात, यांच्या साहित्यिक योगदान आणि त्यासोबत पुराणकथांचे हे संदर्भ बागूल याठिकाणी देतात. हिंदू

VOL- XI ISSUE- II FEBRUARY 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

समर्थशाहीच्या दुतोंडीपणावर टीका करतात. बाबुराव बागूल यांच्या मते स्वातंत्र्याच्या पूर्वी जे साहित्य निर्माण झाले त्यास मराठी साहित्यामध्ये समाजवाद, मार्क्सवाद, गांधीवाद आला पण केशवसुतांनी, हरिभाऊ आपटे यांचे अपवाद वगळता बाकी सारे साहित्य सदाशिव पेठीच्या प्रभावाचे किंवा सदाशिवपेठी होते. दलितांची त्या साहित्यामध्ये कुठेही चित्रणे आली नव्हती आणि त्यानंतर अ साहित्यामध्ये अली आणि ती ही वाचकांना घृणा वाटावी अशीच होती. यावर बाबुराव बागुल म्हणतात की, हा वैरभ अस्पृश्यतेचे सोबतच त्याचा जन्म झाला आहे. भावाचा अस्पृश्य ते सोबतच जन्म झाला आहे. दलित साहित्याच्या एखाद्या वादातून, तत्त्वातून, पक्षांच्या जाहीरनाम्यातून लावला तर ते साहित्य एकसुरी बनवण्याकडे जातो. त्यामु जीवनाच्या स्वाभाविक पणाने लावावा लागतो. एका अर्थी दलित साहित्य म्हणजे वर्णव्यवस्थेच्या काळोखात पिच.... क्रांतीमान कैफियत आहे, असे बाबुराव बागुल यांना वाटते.या शिवाय बाबूराव चागुलांच्या लेखातूर दलित साहित्य हे खरे माणसाचे साहित्य आहे असे मत व्यक्त करतात.दुतोंडीपणावर टीका करतात. बाबुराव बागूल यांच्या मते स्वातंत्र्याच्या पूर्वी जे साहित्य निर्माण झाले त्यास मराठी साहित्यामध्ये समाजवाद, मार्क्सवाद, गांधीवाद आला पण केशवसुतांनी, हरिभाऊ आपटे यांचे अपवाद वगळता बाकी सारे साहित्य सदाशिव पेठीच्या प्रभावाचे किंवा सदाशिवपेठी होते, दलितांची त्या साहित्यामध्ये कुठेही चित्रणे आली नव्हती आणि त्यानंतर अस्पृश्यांची चित्रणे साहित्यामध्ये अली आणि ती ही वाचकांना घृणा वाटावी अशीच होती. यावर बाबुराव बागुल म्हणतात की, हा वैरभाव चिरंजीव आहे. अस्पृश्यतेचे सोबतच त्याचा जन्म झाला आहे, भावाचा अस्पृश्य ते सोबतच जन्म झाला आहे, दलित साहित्याच्या मते जीवनाचा अर्थ एखाद्या वादातून, तत्त्वातून, पक्षांच्या जाहीरनाम्यातून लावला तर ते साहित्य एकसुरी बनवण्याकडे जातो. त्यामुळे जीवनाचा अर्थ जीवनाच्या स्वाभाविक पणाने लावावा लागतो. एका अर्थी दलित साहित्य म्हणजे वर्णव्यवस्थेच्या काळोखात पिचलेल्या कैद्यांची क्रांतीमान कैफियत आहे, असे बाबुराव बागुल यांना वाटते.

या शिवाय बाबूराव बागुलांच्या लेखातून दलित साहित्य हेच खरे माणसाचे साहित्य आहे असे मत व्यक्त करतात, या विधानाची पुष्टी करण्यासाठी ते इतिहासातील अनेक संदर्भ देतात, गणराज्याच्या अस्तकाळी वाढत गेलेली युद्धे, आणि त्यात पराभव झाल्यावर आलेले दास्यत्व व त्यांनी स्पष्ट केले आहे. शोषण व्यवस्थेचा आणि शोषकांच्या स्वभावाचा वेध घेतला आहे. ते म्हणतात "आपल्याला हवी तीचं तत्वे जिवंत ठेवणे हे शोषण व्यवस्थेचे स्वाभाविक वैशिष्ट्य असते. म्हणून इथल्या शोषण सत्तेने विषमता, अस्पृश्यता ही मनापासून जोपासली आहे. त्यावर आधारित विचारांच्या आणि संस्कृतीची रचना किंवा नव्याने मांडणी सुद्धा त्यांनी तशाच पद्धतीने केली आहे. इथल्या शोषण व्यवस्थेला विरोध करणाऱ्या तत्त्वाला एकतर त्यांनी भ्रष्ट केले, नाहीतर नष्ट केले. पण वाढू दिले नाही. इथल्या सर्व सत्तांनी अस्पृश्यता ही स्वाभाविकता म्हणून स्वीकारली आणि म्हणूनच जातक कथांमधील ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य बरोबर पशुपक्ष्यांना ही स्थान मिळाले परंतु दलित समाजातील किंवा आणि त्याच्या पैकी कुणालाही नायक म्हणून स्थान मिळू शकले नाही.

"भारतीय समाज व्यवस्थेकडे सवर्ण किंवा उच्च्चवर्णीयाकडे असणारी सत्ता संपत्ती सामाजिक वर्चस्व आणि दुसऱ्याकडे जाऊ नये म्हणून जात जन्माधर्मावर आधारीत वर्णव्यवस्था प्रबळ करण्यात आली. इथल्या दलित समाजामध्ये आपल्यावर अन्याय का होत आहे, कोण करत आहे, अशी जाणीव झाली आणि अस्पृश्य समाजाला आत्मभान येऊन तो 'विद्रोह' करू लागला किंवा तशी शक्यता वाटली हे इथल्या वर्णवादी समाज व्यवस्थेच्या लक्षात आले त्यावेळी त्यांनी न दिसणारा परमेश्वर पुढे करून मोक्ष संकल्पना वर भर दिला. सत्ता आणि सामर्थ्य असणाऱ्या समाजाला देवत्व देण्यात आले आणि सत्तेत पराभूत झालेल्यांना वाईट प्रवृत्तीचे किंवा त्यांचे राक्षशी करण करण्यात आले. सीता, शूर्पणखा यासारख्या स्त्रियांची विटंबना दुर्लक्षित करण्यात आली हे सांगत असताना बाबुराव बागुल यांनी संस्कृत साहित्यातील एकसुरीपणा आणि संत साहित्याच्या मर्यादाही स्पष्ट करतात. इंग्रजी साहित्याच्या परिचयाने नंतरही बराच काळ मराठी साहित्यात दलितांच्या दुःखांना स्थान मिळालेलं नव्हतं. महत्त्वाचे म्हणजे सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या लेखकांनीही या अन्यायाला वाचा फोडली नव्हती त्यांचे संस्कार जे होते हे संस्कार या प्रकारच्या वर्गीय मर्यादा घालत असल्याचे बागुल म्हणतात. "मराठवाड्यात होणाऱ्या हिंदू मुस्लिम दंगली वर भाष्य

करताना बाबुराव बागुल म्हणतात. या लेखाच्या सुरुवातीलाच ते म्हणतात दुसऱ्या जातीबद्दल तुच्छता आणि तिरस्कार तर स्व: जाती बद्दल प्रेम आणि अहंकार हे हिंदू मानसिकतेचे वैशिष्ट्य आहे. जातिव्यवस्थेमुळे हिंदू माणूस मानसिक दृष्ट्या अजूनही ही गुहाजीवनाच्या आसपासच आहे, कारण स्व:प्रेम आणि परद्वेष ही पशूची आणि गुहामानवाची वैशिष्ट्य आहेत. हे विधान करत असताना बाबूराव बागुल जात जपणारी हिंदू मानसिकता असे, स्पष्ट करतात. त्यांच्या मते जात जपणारा माणूस हा नेहमीच युद्ध मनस्थितीत असतो आणि या प्रवृत्तीच्या लोकांना भूतकाळ फार प्रिय असतो. इतिहास पुराणांचा सदैव गौरव त्यात केला जातो. त्याचे पूजन केलं जातं आणि त्यामुळेच ही माणसे आधुनिकतेचा स्वीकार करू शकत नाहीत. दुसऱ्या जातीतील माणूस महत पदाला पोहोचला की त्यांच्या मनात वैरभाव निर्माण होते आणि ही पराभूत मनोवृत्तीची माणसे जर राजकीय लोकशाहीचा विकास आणि सामाजिक लोकशाहीकडे वळू लागले तर प्रसंगी हुकूमशाहीचा स्वीकार करायला तयार होतात. त्यामुळे बाबुराव बागुल बिहार, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान आणि महाराष्ट्रातील दलितांवर झालेले सदृश्य हल्ले ही पुढील युद्धाची रंगीत तालीम आहे का ? प्रतिकार किती प्रमाणात होतो हे आजमावून पाहिलं जातं का? असे महत्वपूर्ण प्रश्नही ते विचारतात.

'भारतात फॅसिझमची बिजे आहेत' या लेखामध्ये बाबुराव बागुल आपले विचार मांडतात भारत स्वतंत्र झाला तरी स्वातंत्र्योत्तर काळातही भारतीय समाज जीवन हे अजूनही वर्णव्यवस्थेच्या साखळीतच बंद आहे. अनेक धार्मिक, सामाजिक, आर्थिक, कारणामुळे इथले खेडे- पाडे-गाव खदखदत असतात, अशा वेळी कोणतेही लहानसान निमित्त साधून हे वर्णवादी कट एकतर्फी युद्ध सुरू करतात. बाबुराव बागूल यांच्या मते भारतीय संस्कृतीत फॅसिझमची बिजे आहेत फॅसिझमचे वर्णन थोडक्यात करायचे झाले तर हिंसक अहंकार आणि इतरा विषयी तिरस्कार असे करता येईल. त्यामुळे इथले 'फॅसिझम' म्हणजे हिंदूंची वर्णव्यवस्था आहे, विषमता आणि अस्पृश्यता हा आपल्या समाजाचा आत्मा आहे. हीच विचारसरणी गुणवत्तेच्या आधारावर कोणाला वर येऊ देत नाही. त्यामुळे बागुल म्हणतात की जर "भारतात इंग्रजांनी लोकशाहीचे तत्व आणले नसते, सर्वांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून दिली नसती तर कदाचित बाबासाहेबांसारखा द्रस्टा नेता दलित समाजात निर्माणच झाला नसता,

भारतीय समाजातील पारंपरिक हिंदू साहित्याने जातीयवादाला खतपाणी घातले आहे, हे स्पष्ट करताना बाबूराव बागुल अन्य धर्मियांच्या पूज्य ग्रंथाचाही आढावा घेतात. ते म्हणतात की "ख्रिस्ती धर्मात प्रभू येशूने एका सुताराच्या घरी एका कुमारी मातेच्या पोटी जन्म घेतला, मात्र हिंदूंच्या अनेक देवतांनी अनेक अवतार घेतले असले, तरी त्यांच्यापैकी एकाला ही एखाद्या अंत्यजाच्या घरी अवतार घ्यावासा का ? वाटला नाही खिस्ती समाज आणि साहित्याचा पुराणपुरुष येशू गरिबांना आपल्या करूण कवेत घेतो. त्यामुळे तेथील लेखक-कवींना कार्स मार्क्सच्या आधीचं प्रत्यक्ष परमेश्वराचा आधार मिळाला. त्यातूनच दलित, श्रमिक, शेतकरी साहित्याचे विषय झाले. हिंदू साहित्यात मात्र असा आधार मिळत नाही. हिंदूंचा प्रत्येक देव विषमतेचा पुरस्कार करताना दिसतो, मुकाटपणे त्याचा स्वीकार करणारा इथला समाज ही असाच अविचारी दिसून येतो. ख्रिश्चन धर्माच्या खिस्ताने त्यांच्या अनुयायांना दिलेले ज्ञान सर्वांना ऐकता आले मात्र हिंदूंच्या अपूर्व असे वेदातील विज्ञान शूद्र अतिशूद्र आणि पैकी कोणी ऐकले तर त्यास देहदंडाची शिक्षा होत असत. एवढे वेदांमध्ये काय लिहिलं होतं? हे सांगताना बागुल म्हणतात "वेदात इंद्राची स्तुती आहे, त्याने आपल्या शत्रूच्या केलेल्या पराभवाचे वर्णन आहे. हे शत्रू कोण होते हे स्पष्ट करताना संशोधक इंद्राला आणि ऋग्वेदाला शत्रुत्व वाटणारे लोक सुसंस्कृत आणि पुढारलेले होते. मात्र वेदातील सूक्त कारणांनीही प्रगती, संस्कृती नष्ट करणाऱ्या इंद्राची निर्भत्सना न करता केवळ गोडवे गायले हेच दिसून येते. या पाठीमागे असणाऱ्या कारणांचा शोध घेताना बागुल म्हणतात बाहेरून आलेले आर्य आणि स्थानिक आदिवासी आर्य तर यामध्ये भूमीच्या मालकीवरून युद्ध सुरू झाले. या युद्धात आर्यांचा पराभव म्हणजे नष्ट होणे किंवा नव्या भूमिच्या शोधात पुन्हा दिशा धुंडाळणे त्यामुळे ही युद्ध कार्यासाठी पवित्र ठरले आणि जे त्यांना देवत्व आले हे साहित्य मुळातच युद्धसाहित्य असल्याने ते पक्षपाती असणे स्वाभाविकच आहे, असे वाटते,

*"जळण जळावे तसा चाललो जळत मुक्याने*
*हृदयावर क्रूर नाचत हसत होती मरणे*
*हाक न कुठली कधी नि मन मोहरले नाही*
*नित्य उभ्या हंबरल्या रक्तामधल्या गाई"*

दलित साहित्याचे समर्थ लेखक बाबुराव बागूल या मुलाखतीमध्ये दलितत्वाची जाणीव होऊन लिखाणाला केलेली सुरुवात आणि त्यातून बाहेर पडलेला खदखदणारा विद्रोह बाबुराव बागूल यांनी मांडला आहे. तसेच बाबुराव बागुल दलित जीवनाचा क्रांतदर्शी भाष्यकार या शीर्षकाने लेखकाने घेतलेल्या मुलाखतीत ही बाबुराव बागुल यांनी साहित्यलेखन चळवळ जन्मापासून ते लेखन प्रक्रियेपर्यंत सविस्तर माहिती सांगितली आहे, बाबुराव बागूल यांनी स्वगतमध्ये डोक्यावर मोठे केस, मोठे कपाळ, मोठे लोके, मोठे डोळे, अंगात असेल सदरा, पायजमा, पायात चप्पल, डोक्यात आनंद खिशात नोकरीसाठी अर्ज, ओळखपत्रे बगलेत एक-दोन पुस्तके हा मी रस्त्यावर सकाळपासून कंपन्या कंपन्या वर भरती आहे का? पाहत जाणे असे असले तरी, जिथे तिथे उभे राहणे, दुपारी दोन-तीन वाजेपर्यंत नोकरी मिळते का ते पहाणे, मग धकून-भागून स्टेशन वर येणारी जाणारी गर्दी बघत बसणे, कधी बागेत, कधी लायब्ररीत वाचत बसणे, या सर्व परिस्थितीला आणि हिंदू धर्म व्यवस्थेतील अस्पृश्यता आणि नकार याला कंटाळून यांच्या 'दलित साहित्य: आजचे क्रांतीविज्ञान' या ग्रंथामध्ये यशवंत मनोहर सारख्या सम्यक क्रांतीचा नकार, विद्रोह मानव मध्यमवर्गीयत्व अनात्मवाद, अनिईश्वरवादी, जडवादी तत्वज्ञान, ज्ञान- विज्ञान आणि या विज्ञानाच्या योग्य उपयोग करण्यासाठी सत्ता, अर्थ सत्ताच तरी त्यांच्या हातात असणे ही सम्यक क्रांतीची सूत्रे आहेत, हीच दलित जाणीव होय हीच सूत्रे यशवंत मनोहरांच्या कवितेतील आढळतात.

*"या दांभिकाच्या दृष्ट दुनियेत*
*क्षणभर नाही चैन मला*
*म्हणेल केव्हा हा देश मला*
*ये तरुणा, ये थापी घे, हे पेन घे, हे अवजार घे*
*ए किमयागार ये.*
*शिल्पकार ये !"*

आपल्या सप्रमाण लेखांच्या शेवटी निष्कर्षा कडे येताना बाबुराव बागुल म्हणतात हिंदू धर्म, हिंदू धार्मिक आणि ललित साहित्य हे ब्राह्मण क्षेत्र याचे पक्षपाती आहे. विषमतेचा पुरस्कार करणारे आहे. श्रमिक हिंदूंना निष्प्रभ करणारे आहे. श्रमिक हिंदूंना प्रेरणादायी ठरणारे अन ईश्वरवादी पण आत्मवादी जडवादी तत्त्वज्ञान हे हिंदू तत्त्वज्ञानासाठी ब्राह्मण क्षेत्रीयांच्या वर्चस्वाला आव्हान देणारे होते. म्हणून ते नष्ट, भ्रष्ट केले गेले. बाबूराव बागूल यांच्या या 'दलित साहित्य आजचे क्रांतीविज्ञान' या ग्रंथामध्ये यशवंत मनोहर सारख्या सम्यक क्रांतीचा नकार, विद्रोह मानव मध्यमवर्गीयत्व अनात्मवाद अनिईश्वरवादी जडवादी तत्वज्ञान, ज्ञान विज्ञान आणि या विज्ञानाच्या योग्य उपयोग करण्यासाठी सत्ता, अर्थ सत्ताच तरी त्यांच्या हातात असणे ही सम्यक क्रांतीची सूत्रे आहेत, हीच दलित जाणीव होय हीच सूत्रे यशवंत मनोहरांच्या कवितेतील आढळतात.

**संदर्भ** :-


1. संपादक :- ताकसांडे मधुकर, 'दलित साहित्य आजचे क्रांतीविज्ञान' बाबुराव बागुल, बुद्धिष्ट पब्लिशिंग हाऊस नागपूर
2. विसाव्या शतकातील भारतातील साहित्य, संपादक: नलिनी नटराजन, इमॅन्युएल संपत नेल्सन. ग्रीनवुड.
3. एनसायक्लोपीडिया ऑफ इंडियन लिटरेचर: सासे टू झोगॉट, अमरेश दत्ता, मोहन लाल. साहित्य अकादमी, 1994. पृष्ठ 4060 .
4. लघुकथेची शंभर वर्षे द हिंदू, २० मे २००१.
5. जेव्हा मी जात चोरली होती (1963) एनसायक्लोपीडिया ऑफ इंडियन लिटरेचर खंड. 2 संपादक अमरेश दत्ता. साहित्य अकादमी,
6. "बाबुराव बागुल यांचे "विद्रोह": एक फॅनोनियन वाचन" . 28 मार्च 2020.
7. "दलित साहित्याचे महाकाव्य: बाबुराव बागुल यांनी माझी जात लपवली तेव्हा" . 15 डिसेंबर 2019.
8. साहित्यिक बाबुराव बागुल यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार 27 मार्च 2008
9. पुरस्कार, सन्मान आणि सहयोग: बाबुराव बागुल गौरव पुरस्कार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
10. बागुल, बाबुराव (10 जुलै 2018). जेव्हा मी माझी जात लपवली: कथा.
11. बागुल, बाबुराव (2018). मारन स्वस्त गरम अहे (मराठीत). लोकवंदमय गुन्हा.
12. बागुल, बाबुराव (2018). जेव्हा मी माझी जात लपवली — कथा.